MHPU080007612024

आर. सी. सी. क्र. १७४/२०२४
सरकार वि. अतुल आमले व १

## निशाणी क्रमांक ९ वरील आदेश

१. अर्जदार सौ. किरण संजय चंद्रात्रे हे दौलतनगर, उत्तमनगर, नाशिक येथील रहिवाशी असुन त्यांनी त्यांच्या अर्जात नमुद केलेले आहे की, त्यांचे चांदीचे दागिने दिनांक १०/०४/२०२४ रोजी चोरीला गेले होते. सदर दागिने त्यांच्या मालकीचे आहेत व ते पोलिसांना सापडलेले आहेत. सदर बाब त्यांना दिनांक ०५/०५/२०२५ रोजी दिघी पोलीस स्टेशन येथे गेल्यावर समजली. सदर दागिन्यांबाबत गु.र.क्र.१७६/२०२४ भारतीय दंड विधानाचे कलम ४५४, ४५७ व ३८० अंतर्गत दाखल करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा तपास करीत असताना तपासी अंमलदाराने १०० ग्रॅम चांदीचे पैंजण व जोडव्या, १५ ग्रॅम चांदीचे ब्रेसलेट व १७० ग्रॅम चांदीचे ताट जप्त केलेले आहेत. सदर चांदीचे दागिने पोलिसांनी गुन्हाच्या तपासात जप्त केलेले असून ते पोलीस स्टेशनला पडुन आहेत. नमुद दागिन्यांची फिर्यादीला दैनंदिन कामाकरीता आवश्यकता आहे. तसेच, नमुद दागिने हे अर्जदाराच्या मालकीचे आहेत. सबब, सदर चांदीचे दागिने मिळण्याकरीता अर्जदाराने प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्जावर विद्वान सरकारी वकीलांचा खुलासा मागविण्यात आला होता. विद्वान सरकारी वकीलांनी त्यांच्या खुलाश्यादरम्यान नमुद केले की, अर्जदाराने अर्जासोबत दाखल केलेल्या दागिन्यांच्या पावतीवर तिचे नाव नमुद नाही. सबब, अर्जदार दागिन्यांची मालक नाही. तसेच, तपासादरम्यान जप्त केलेले

दागिने व अर्जदाराने अर्जादरम्यान न्यायालयाकडुन मागितलेले दागिने यामध्ये तफावत आहे. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

३. अर्जदाराचे विद्वान वकील श्री. ए. के. चौधरी यांना ऐकले. तसेच, संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले.

४. सदर खटल्यात मनी बिलतसिंग हे फिर्यादी असून त्यांनी दिनांक १०/०४/२०२४ रोजी गु.र.क्र.१७६/२०२४ भारतीय दंड विधानाचे कलम ४५४, ४५७, ३८० सह कलम ३४ अंतर्गत दाखल केला होता. फिर्यादीने त्याच्या फिर्यादीत नमुद केले की, तो गावी गेला असताना त्याच्या फलॅटचे लॉक तोडुन त्याच्या घरी चोरी झाली होती. फिर्यादीच्या घरातुन १६ ग्रॅम वजनाची १ सोन्याची अंगठी, २६ ग्रॅम वजनाचा पदक असलेला सोन्याचा नेकलेस, १०० ग्रॅम वजनाचे चांदीचे पैंजण, १५ ग्रॅम वजनाचे चांदीचे ब्रेसलेट तसेच १७० ग्रॅम वजनाचे चांदीचे पुजेचे ताट चोरीस गेले होते. तपासादरम्यान तपासी अंमलदाराने १५० ग्रॅम वजनाचे चांदीचे देवपुजेचे ताट, २ लहान पणत्या, १ लहान वाटी, १५ ग्रॅम वजनाचे चांदीचे ब्रेसलेट, १०० ग्रॅम वजनाचे चांदीचे पायातील पैंजण व १० ग्रॅम वजनाच्या चांदीच्या मासोळया जप्त केलेल्या आहेत.

५. येथे नमुद करणे गरजेचे आहे की, अर्जदाराने तिच्या अर्जासोबत शिवम ज्वेलर्सची एक पावती दाखल केलेली आहे. परंतु, सदर पावतीवर अर्जदाराचे नाव नमुद नसून त्यावर "पापसिंह" हे नाव नमुद आहे. सदर पावतीवर कोणतीही तारीख नमुद नाही. सदरचा अर्ज मुळ फिर्यादीने दाखल केलेला नाही. तसेच, अर्जात अर्जदाराचे मुळ फिर्यादीसोबत काय नातेसंबंध आहे याचे देखील स्पष्टीकरण दिलेले नाही. येथे नमुद करणे गरजेचे आहे की, अर्जदाराने तिचे

कोणतेही ओळखपत्र देखील अभिलेखावर दाखल केलेले नाही. अर्जाचे शपथपत्र देखील किरण संजय चंद्रात्रे या नावाचे आहे. सबब, अर्जदाराचा सदर गुन्हयाशी काय संबंध आहे याबाबतचे कोणतेही स्पष्टीकरण अर्जदाराने अभिलेखावर दिलेले नाही. सदर खटल्यात दिनांक १२/०६/२०२४ रोजी दोषारोपपत्र दाखल केलेले आहे. दोषारोपपत्रासोबत सादर केलेल्या साक्षीदारांच्या यादीमध्ये देखील अर्जदाराचे नाव नमुद नाही. सदर अर्जामध्ये अर्जदाराची ओळख न पटल्याने तसेच अर्जदाराने अर्जात नमुद केलेल्या दागिन्यांवर तिचे मालकी हक्क शाबित न केल्यामुळे सदर गुन्हयात जप्त करण्यात आलेल्या चांदीच्या दागिन्यांचा ताबा अर्जदाराकडे देणे संयुक्तिक व न्याय होणार नाही. सबब, अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यास पात्र नाही. म्हणुन मी खालिल आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

अर्ज नामंजूर करण्यात येतो .

LALIT VASANTRAO SHRIKHANDE
Digitally signed by LALIT VASANTRAO SHRIKHANDE

(एल.व्ही. श्रीखंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र. ३, खडकी, पुणे

दिनांकः– २९/०८/२०२५

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. S. Gupte (Grade- III) |
| Name of the Court | : | Shri. L. V. Shrikhande,<br>J.M.F.C. Court No. 3, Khadki, Pune |
| Date | : | 29.08.2025 |
| Order signed by the Presiding officer on | : | 29.08.2025 |
| Order uploaded on | : | 29.08.2025 |